सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

# तंबाखू, सुपारी आणि गुटखा, खर्रा सेवनाविषयी तुम्हाला हे माहीत आहे का ?

- तंबाखू सेवन हा भारतीय संस्कृतीचा भाग नाही. सन १६०० च्या सुमारास पोर्तुगीज लोकांनी भारतात तंबाखू आणली आणि कालांतराने तंबाखू सेवनाची सवय लोकांमध्ये जडली.
- तंबाखू, गुटखा आणि सुपारीमध्ये विविध प्रकारचे रासायनिक घटक असतात. या पदार्थांचे सेवन करत असलेल्या महिला आणि पुरुषांमध्ये विविध प्रकारचे कर्करोग होतात, यात प्रामुख्याने तोंडाचा, घशाचा, फुफ्फुसांचा कर्करोग यांचा समावेश आहे.
- तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे हृदयविकार, फुफ्फुसांचे आजार आणि स्ट्रोक यांसारखे आजार होत आहेत.
- तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या पुरुषांमध्ये नपुंसकता दिसून येत आहे, या सवयी मुल न होण्याकरिता कारणीभूत ठरत आहेत.
- कर्करोग होण्यापासून बचाव करण्याकरिता तंबाखूचे सेवन करू नये आणि जर करत असाल तर लवकर या सेवनाचा त्याग करा.
- आपल्या राज्यातील प्रत्येक महिला आणि पुरुष जे तंबाखू, गुटखा आणि सुपारीचे सेवन करत आहे, ते कर्करोग आजार आणि विविध असंसर्गजन्य आजार होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचे संशोधनात आढळून आले आहे.
- गुटखा, तंबाखू, खर्रा, जर्दा, सिगारेट, विडी, गावठी तंबाखू इत्यादी सर्व घटक हे आरोग्यास हानिकारक आहेत.
- जर का तुमच्या नजीक कोणी धूर सहित तंबाखूचे ( सिगारेट, विडी, हुक्का, ई. ) सेवन करत आहे आणि तुम्ही त्या धुरास अप्रत्यक्षरित्या सेवन करत आहात, तर सावधान व्हा आणि त्या व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास मनाई करा. हा धूर तुमच्या आरोग्यास देखील हानिकारक आहे.
- गर्भवती महिलेच्या जवळपास कोणीही सिगारेट, विडीचे सेवन करणार नाही याची दक्षता घ्या, यामुळे अर्भकाचे वजन कमी होणे तसेच इतर गंभीर परिणाम होवू शकतात !!

## तंबाखू मुक्ती मदत केंद्र -टोल फ्री क्र. : १८०० ११ २३५६

तंबाखू, गुटखा, सिगारेट, खैनी, खर्रा तसेच इतर तंबाखू पदार्थ शासकीय कार्यालये / रुग्णालये व सार्वजनिक ठिकाणी सोबत बाळगण्यास व त्यांचे सेवन करण्यास मनाई आहे



**शहाणपणा सिगारेट ओढण्यामध्ये नाही... सोडण्यामध्ये आहे !**

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर दंडात्मक कार्यवाही होईल



भारत सरकार, सार्वजनिक आरोग्य विभाग, टाटा मेमोरियल सेंटर जनहितार्थ प्रकाशित

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

# राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

## निरोगी आणि आदर्श गाव बनविण्याकरिता आपण सर्वांनी काय करायला हवे ?

- गावातील ३० वर्ष पेक्षा अधिक वय असलेल्या सर्व ग्रामस्थांची आयुष्मान आरोग्य मंदिर येथे मौखिक तपासणी करावी.
- गावातील जे ग्रामस्थ तंबाखू, गुटखा आणि सुपारी चे सेवन करतात, अशा सर्व ग्रामस्थांची नजीकच्या आरोग्य केंद्रात तोंडाची तपासणी करून घ्यावी.
- राज्य शासन आपल्या नजीकच्या आरोग्य केंद्रात तंबाखू, सुपारी, गुटखा, ई. पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आजाराच्याकरिता मोफत तपासणी करत आहे.
- आपल्या ग्रामसभेअंतर्गत सरपंच, ग्रामसेवक / ग्राम सदस्य आणि वैद्यकीय अधिकारी, आयुष्मान आरोग्य मंदिर प्रत्येक महिन्यात गावातील सर्व महिला आणि पुरुषांसाठी आरोग्य विषयक चांगल्या सवयी आणि तंबाखू मुक्ती करिता बैठक घ्यावी.
- गावात ग्रामसभेच्या आणि आयुष्मान आरोग्य मंदिर येथील अधिकारी यांच्या मदतीने कोटपा कायदा २००३ ची अंमलबजावणी करावी.
- तोंडाचा कर्करोग निदान आणि उपचाराकरिता टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या समन्वयाने जिल्हा स्तरावर मोफत आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

**हे कार्यालय तंबाखू मुक्त आहे.**

**या कार्यालयाच्या आवारात जर कोणी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करत असेल, तर रु. २०० पर्यंत दंड आकारण्यात येईल.**

**तक्रारीसाठी आणि अधिक माहितीकरिता**

**नोडल अधिकाऱ्याचे नाव :** ______________________

**दूरध्वनी क्रमांक :** ______________________

## तुम्हाला कोटपा कायदा २००३ माहीत आहे का ?

- देशातील तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक आणि सामाजिक दुष्परिणामाला आळा घालण्याकरिता केंद्र शासनाने तंबाखू प्रतिबंध कायदा २००३ केला आहे.
- या कायद्याची प्रमुख कलमे खालीलप्रमाणे आहेत,

| | कलम | कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षा व दंड |
|---|---|---|
| कलम ४ | सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी आहे | रु. २०० दंड |
| कलम ५ | सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातीवर बंदी करावी | तुरुंगवास आणि रु. १००० व ५००० दंड |
| कलम ६ अ | १८ वर्षाखालील मुले व मुली यांना सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी आहे | रु. २०० दंड |
| कलम ६ ब | कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्डच्या परिसरात सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी आहे | रु. २०० दंड |
| कलम ७ | सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या वेष्टनावरील ८५% भागावर धोकादायक चित्रमय इशारा असावा | तुरुंगवास आणि रु. ५००० व १०००० दंड |

**तंबाखू मुक्ती मदत केंद्र**
**टोल फ्री क्र. :**
**१८०० ११ २३५६**

**तंबाखू, गुटखा, सिगारेट, खैनी, खर्रा तसेच इतर तंबाखू पदार्थ शासकीय कार्यालये / रुग्णालये व सार्वजनिक ठिकाणी सोबत बाळगण्यास व त्यांचे सेवन करण्यास मनाई आहे**



**शहाणपणा सिगारेट ओढण्यामध्ये नाही... सोडण्यामध्ये आहे !**

**सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर दंडात्मक कार्यवाही होईल**



भारत सरकार, सार्वजनिक आरोग्य विभाग, टाटा मेमोरियल सेंटर जनहितार्थ प्रकाशित